International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 4.935
Vol.8 No.4 Mar – Apr 2021

# जागतिक व्यापार संघटना आणि भारतीय लघुउद्योग क्षेत्र

**डॉ. संदीप बाबुराव अभंग.**
सहा. प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर पिन - ४१३७०१

**गोषवारा :**

लघुउद्योग हे भारतीय अर्थव्यवस्थेतील एक महत्वाचे क्षेत्र आहे. भारताच्या एकूण औद्योगिक उत्पादन, एकूण कारखाने, औद्योगिक रोजगार, स्थूल देशांतर्गत उत्पादन आणि एकूण निर्यातीतील लघुउद्योगांचे प्रमाण अनुक्रमे४० टक्के, ७६ टक्के, ५२ टक्के, ८ टक्के आणि ३५ टक्के असे लक्षणीय आहे. याशिवाय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ, बेकारी व दारिद्रय निर्मूलन, सामाजिक न्याय, महिला सबलीकरण, परकीय चलनाची प्राप्ती इत्यादी दृष्टीने लघुउद्योग महत्वाचे आहे. म्हणून भारत सरकारने स्वातंत्र्यप्राप्तीनंतरम्हणजेच जागतिक व्यापार संघटनेचे सभासदत्व स्वीकारण्यापूर्वी या क्षेत्राला अनेकसवलती व अधिकार दिले होते. अनेक वस्तूंचे उत्पादन हे लघुद्योग क्षेत्रासाठी राखीव ठेवण्यात आले होते तसेच लघुउद्योगांनी उत्पादित केलेल्या वस्तूंच्या निर्यातीसाठी सरकारकडून मदत केली जात असे. परंतू सरकारने १ जानेवारी १९९५ पासून जागतिक व्यापार संघटनेचे नियम, करार व अटींचा स्वीकार केल्याने लघुउद्योगांच्या सर्व संरक्षण विषयक सवलती व तरतूदी काढून घेतल्या. त्यामुळे भारतीय लघुउद्योगांपुढे अनेक आव्हाने व समस्या उभ्या राहिल्या आहेत. लघुउद्योगांना बहुराष्ट्रीय कंपन्या आणि मोठ्या उद्योगांशी तीव्र स्पर्धा करावी लागत आहे. खुल्या व्यापार धोरणामुळे परदेशातून विशेषतः चीन मधून खेळणी, विजेचे उपकरणे, यंत्रांचे सुटे भाग तसेच गृहोपयोगी वस्तूंच्या होणाऱ्या स्वस्त आयातीमुळे लघुउद्योग क्षेत्र संकटात सापडले आहे. परिणामी लघुउद्योग आजारी व बंद पडण्याचे प्रमाण वाढलेले आहे. असे असले तरी भारतीय लघुउद्योगाना जागतिक पातळीवर नवनवीन संधी देखील उपलब्ध झालेल्या आहेत, याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. भारत सरकारने जागतिक व्यापार संघटनेचे नियम, करार व अटीं विचारात घेऊन या क्षेत्राच्या विकासासाठी सर्वसमावेशक असे धोरण आखणे आवश्यक आहे. असे झाले तर भारतीय लघुउद्योग देशाच्या औद्योगिक आणि पर्यायाने आर्थिक विकासात मोलाची भूमिका पार पाडतील,याबाबत तीळमात्र शंका नाही.

**कळीचे शब्द:** जागतिक व्यापार संघटना, लघुउद्योग, औद्योगिक धोरण, परकीय गुंतवणूक, बौद्धिक संपदा अधिकार.

## प्रस्तावना:

भारताच्या आर्थिक विकास प्रक्रियेत आणि पर्यायाने औद्योगिक विकासात लघुउद्योगांचे योगदान अतिशय उल्लेखनीय आहे. देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाची उद्दिष्टे साध्य करून देशाचा सर्वांगिण विकास घडवून आणण्यात लघुउद्योगांचा सिहांचा वाटा आहे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारने आर्थिक विकासातील समस्या-अडचणी सोडविण्याचा रामबाण उपाय म्हणून लघुउद्योग क्षेत्राच्या विकासाकडे पाहिले त्यामुळे देशात लघुउद्योग क्षेत्राच्या विकासाला चालना मिळाली. भारत सरकारच्या लघुउद्योग मंत्रालयाच्या २०१८-१९ मधील वार्षिक अहवालानुसार भारतातील लघुउद्योगांची संख्या ६३.३९ दशलक्ष तर गुंतवणूक व उत्पादन मूल्य अनुक्रमे ११,९३,८३५ कोटी रुपये आणि २१,९३,५३० कोटी रुपये इतके होते. रोजगार निर्मितीच्या दृष्टीने लघुउद्योग क्षेत्र आघाडीवर दिसून येते.२०१८-१९ मध्ये या उद्योगांनी एकूण १३९.१६ लाख व्यक्तींना रोजगार पुरविला होता. सध्या लघुउद्योग क्षेत्रात ६००० पेक्षा जास्त विविध वस्तूंचे उत्पादन करून त्याची जगभर निर्यात केली जात आहे. या क्षेत्राने देशाला २०१८-१९ मध्ये निर्यातीतून १०,६६,९४४ कोटी रुपयांचे परकीय चलन मिळवून दिले.

लघुउद्योगांचे भारताच्या आर्थिक व औद्योगिक विकासातील स्थान विचारात घेऊन भारत सरकारने स्वातंत्र्योत्तर काळात या उद्योगांना विविध स्वरूपाच्या अदयावत सोई - सुविधा उपलब्ध करून दिल्या. काळानुरूप औद्योगिक धोरणात बदल करून त्यांना बदलत्या परिस्थितीचा सामना कसा करता येईल याची दखल घेतली. १९९० च्या दरम्यान भारतीय अर्थव्यवस्था अभूतपूर्व अशा आर्थिक संकटात सापडली त्यामुळे जुलै १९९१ मध्ये या आर्थिक संकटातून मार्ग काढण्यासाठी सरकारने नवीन आर्थिक कार्यक्रमाचा आणि १ जानेवारी १९९५ ला जागतिक व्यापार संघटनेचे सभासदत्व स्वीकारले. जागतिक व्यापार संघटनेचे नियम, तरतूदी, करार आणि अटी यांना अनुसरून सरकारने कृषी, बँकिंग, गुंतवणूक, चलनविषयक व राजकोषीय धोरण, व्यापारविषयक धोरण आणि औद्योगिक धोरणात आवश्यक ते बदल केले. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाची प्रक्रिया वेगाने सुरु झाली. भारत सरकारने जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांना अनुसरून लघुउद्योग क्षेत्रासंबंधीच्या धोरणात कोणते बदल केले ? त्या बदलांचा लघुउद्योग क्षेत्राच्या विकासावर काय परिणाम झाला ? लघुउद्योगांच्या अडचणी व समस्यांचे निवारण झाले किंवा कसे? याचे विश्लेषण या शोधनिबंधात करण्याचा प्रयत्न केला आहे.

## अभ्यासाची उद्दिष्टे :

प्रस्तूत शोध निबंधाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत

१. जागतिक व्यापार संघटनेचे नियम, अटी आणि करार यांची माहिती घेणे.
२. जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांना अनुसरून सरकारने लघुउद्योग क्षेत्राशी संबंधित धोरणात केलेल्या बदलांचा अभ्यास करणे.
३. जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेनंतरच्या काळातील लघुउद्योग क्षेत्राच्या प्रगतीचा अभ्यास करणे
४. लघुउद्योगांच्या विकासातील समस्या-अडचणी यांचा शोध घेऊन त्या सोडविण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

## संशोधन पद्धती :

प्रस्तूत शोध निबंधाचा विषय स्थूलदर्शीस्वरूपाचा असून त्यात जागतिक व्यापार संघटनेचे नियम अटी आणि करार यांचे भारतीय लघुउद्योग क्षेत्रावर जे बरेवाईट परिणाम झाले आहेत,त्यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. विश्लेषणासाठी दुय्यम माहिती व आकडेवारीचा वापर करण्यात आला आहे ही आकडेवारी व माहिती भारताचे आर्थिक सर्वेक्षणे, भारताच्या सुक्ष्म, लघु व मध्यम उदयोग मंत्रालयाचे वार्षिक अहवाल रिझर्व्ह बँकेची विविध प्रकाशने, जागतिक व्यापार संघटनेचे अहवाल, विविध संदर्भ ग्रंथ शोध निबंध आणि मासिके इत्यादी मधून संकलित केली आहे लघुउद्योगांची संख्या उत्पादन, रोजगार, निर्यात आणि भारत सरकारचे लघुउद्योग क्षेत्रासंबंधीचे धोरण हे निर्देशके विश्लेषणासाठी विचारात घेतली आहेत. संकलित केलेल्या माहितीवर प्रक्रिया करण्यासाठी वार्षिक वृद्धीदर, संयुक्त वार्षिक वृद्धीदर, पटीतील वाढ आणि शेकडेवारी ही सांख्यिकीय आणि गणितीय साधने वापरली आहेत.

## जागतिक व्यापार संघटनेचे स्वरूप व व्याप्ती:

१ जानेवारी १९९५ पासून जागतिक व्यापार संघटनेने आपल्या कार्याला सुरुवात करून जगातील सर्व देशांना बहुपक्षीय व्यापाराचे हक्काचे व्यासपीठ मिळवून दिले सध्या जागतिक व्यापार संघटनेचे १६४ देश सदस्य आहेत. सभासद देशातील व्यापार नियमन, व्यापारविषयक विवादांचे निवारण, व्यापार वाढीसाठी प्रयत्न, व्यापारावरील निर्बंध कमी करणे इत्यादीसाठी जागतिक व्यापार संघटनेने अनेक नियम, अटी, तरतूदी आणि करार केले आहेत. यामध्ये पुढील प्रमुख करारांचा समावेश आहे

### अ. शेतीविषयक करार:

जागतिक व्यापार संघटनेच्या शेती विषयक करारांचा प्रमुख उद्देश देशांतर्गत उत्पादन आणि निर्यात वाढीसाठी दिले जाणारे अर्थसहाय्य कमी करणे हा होता. त्यासाठी संघटनेने बाजार प्रवेश, देशांतर्गत मदत आणि निर्यात अनुदाने इत्यादीशी संबंधित अनेक नियम व करार केले आहेत

### ब. व्यापाराशी निगडीत बौद्धिक संपत्ती अधिकार:

बौद्धिक संपत्ती अधिकार या करारानुसार कोणत्याही नवीन शोध व संशोधनाच्या नोंदणीकृत पेटंटसाठी २० वर्षापर्यंत जगात एकाधिकार असेल. TRIPS करारांतर्गत जागतिक व्यापार संघटनेने एकूण सात बौद्धिक संपदांचा समावेश केला आहेयामध्ये कॉपीराईट व ट्रेडमार्क, व्यापार चिन्हे, भौगोलिक चिन्हांकन, संघटीत बाजार, व्यापारिक रहस्य इत्यादींचा समावेश आहे.

### क. सेवा व्यापाराचा सर्वसाधारण करार:

आंतरराष्टीय पातळीवरील सेवांचा या करारात समावेश करण्यात आलेला आहे जागतिक व्यापार संघटनेने या करारांतर्गत बँकिंग, विमा, वाहतूक व दळणवळण, संशोधन, शिक्षण, आरोग्य इत्यादी सेवांचा समावेश केला आहे. या कराराने स्वदेशी सेवा देणारा आणि विदेशी सेवा देणारा या दोघांनाही समान दर्जा दिलेला आहे. तसेच सेवा क्षेत्रावरील सर्व निर्बंध सभासद देशांनीदूर करावेत असे या करारात स्पष्ट करण्यात आले आहे

**ड. व्यापाराशी निगडीत गुंतवणूक उपाय:**

या करारानुसार कोणत्याही सदस्य देशाला भांडवल गुंतवणूकीचे नियमन व नियंत्रण करता येणार नाही खुला व्यापार करार लागू झाल्यापासून विकसित देशांनी २ वर्षांत , विकसनशील देशांनी ७ वर्षांत तर अल्पविकसित देशांनी १० वर्षांत आपल्या देशातील खुल्या व्यापारास हानिकारक नियम, तरतूदी आणि कायदे बदलणे आवश्यक आहे.

**इ. अवपुंजनाविरुद्ध उपाय:**

जागतिक व्यापार संघटनेच्या करारानुसार सदस्य देशांनाअवपुंजनाविरुद्ध उपाय करण्याची परवानगी देण्यात आली आहे. गॅटच्या परिच्छेद VI नुसार जर अवपुंजनामुळे आयातक देशांतील उद्योगांचे नुकसान होत असेल तर तो देश अवपुंजनाविरोधी उपाययोजना करू शकतो. तसेच अवपुंजन करणाऱ्यांच्या विरोधात जागतिक व्यापार संघटनेच्या तक्रार निवारण मंडळात कायदेशीरतक्रार करू शकतो.

**ई. व्यापार सुलभीकरण करार:**

व्यापार सुलभीकरण करारात सीमाशुल्का संदर्भात असलेल्या प्रक्रिया सुलभ करून त्यामध्ये पारदर्शकता आणणे, इलेक्ट्रॉनिक पेमेंट पद्धतीचा वापर करणे, जोखीम व्यवस्थापन तंत्र, व्यापाऱ्यांना अपील करण्याचा हक्क इत्यादींचा समावेश आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या मते व्यापार सुलभीकरण कराराची पुर्ण अंमलबजावणी झाल्यास सभासद देशांच्या खर्चामध्ये सरासरी १४.३० टक्के घट होईल.

**फ. तक्रार निवारण यंत्रणा:**

बहुपक्षीय व्यापाराला चालना देण्यासाठी तसेच सदस्य देशांचे अधिकार व कर्तव्य यांच्याशी संबंधित विषयावर विचार विनिमय करून मतभेद मिटविण्याकरिता जागतिक व्यापार संघटनेने तक्रार निवारण यंत्रणा स्थापना केली आहे. भारत सरकारने बासमती तांदूळ आणि हळदीचे पेटंट अमेरिकेकडूनजागतिक व्यापार संघटनेच्या तक्रार निवारण यंत्रणेच्या माध्यमातूनचपरत मिळविले आहे.

थोडक्यात जागतिक व्यापार संघटनेच्या व्यापारविषयक करारांमुळेजागतिक व्यापार आणि सदस्य देशांतील व्यापारात वाढ होईल.मात्र भारतासारख्या विकसनशील देशांवर या करारांचे बऱ्यावाईट परिणाम होतील असे वाटते.

## जागतिक व्यापार संघटना आणि भारतीय लघुउद्योग:

जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांना अनुसरून भारत सरकारने लघुउद्योग क्षेत्रासंबंधीच्या धोरणात केलेले बदल आणि त्यांचा लघुउद्योग क्षेत्राच्या विकासावर झालेल्या परिणामांचे विश्लेषण केले असता पुढील निष्कर्ष निदर्शनास आले.

### १ जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेपूर्वीचा काळ:

जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेपूर्वीच्या काळातील लघुउद्योग क्षेत्राच्या प्रगतीचा तपशील पाहिल्यास (तक्ता क्र.१) १९८०-८१ ते १९९४-९५ या दरम्यान लघुउद्योगांची संख्या ९.१० पटींनी (८.७४ लाखांवरून ७९.६० लाखांपर्यंत), उत्पादन ४.३५ पटींनी (२८,०६० कोटी रुपयांवरून १,२२,१५४ कोटी रुपये),

रोजगार २.६९ पटींनी (७१.०० लाख व्यक्तींवरून १९१.४० लाख व्यक्ती) आणि निर्यातीत १७.६९ पटींनी (१,६४३ कोटी रुपयांवरून २९,०६८ कोटी रुपये) वाढ झाल्याचे स्पष्ट होते. याच दरम्यान भारताच्या एकूण निर्यातीतील लघुउद्योग क्षेत्राने केलेल्या निर्यातीचे प्रमाण २४.४८ टक्क्यांवरून ३५.२० टक्क्यांपर्यंत वाढलेले आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेपूर्वीच्या काळात लघुउद्योगांची संख्या, उत्पादन, रोजगार आणि निर्यातीत प्रतिवर्ष अनुक्रमे १७.१० टक्के, ११.०७ टक्के, ७.३४ टक्के आणि २२.७८ टक्के या संयुक्त वार्षिक अभिवृद्धी दराने वाढ झाली.

## २ जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेनंतरचा काळ:

जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेनंतरच्या काळात म्हणजे १९९५-९६ ते २०१८-१९ या दरम्यान लघुउद्योगांची संख्या, उत्पादन, रोजगार आणि निर्यातीत अनुक्रमे ८२.८४ लाखांवरून ६३३.९० लाख (७.६५ पट), १,४७,७१२ कोटी रुपयांवरून २१,९३,५३० कोटी रुपये (१४.८५ पट), १९७.९३ लाख व्यक्तींवरून १,३९१.६० लाख व्यक्ती (७.०० पट) आणि ३६,४७० कोटी रुपयांवरून १०,६६,९४४ कोटी रुपये (२९.२५ पट) अशी वाढ झाली (तक्ता क्र.१). भारताच्या एकूण निर्यातीतील लघुउद्योग क्षेत्राने केलेल्या निर्यातीचे प्रमाण १९९५-९६ मध्ये ३४.२५ टक्के एवढे होते. त्यात नंतरच्या काळात सतत चढ - उतार होऊन २०११-१२ मध्ये १८.४५ टक्क्यांपर्यंत कमी झाले. त्यानंतर त्यात पुन्हा वाढ होत जाऊन २०१७-१८ मध्ये ते ५०.७२ टक्क्यांपर्यंत वाढल्याचे दिसून येते. १९९५-९६ ते २०१८-१९ याकाळात प्रतिवर्ष लघुउद्योगांच्या संख्येत १७.१० टक्के, उत्पादनात ११.०७ टक्के, रोजगारात ७.३४ टक्के आणि निर्यातीत २२.७८ टक्के या संयुक्त वार्षिक अभिवृद्धी दराने वाढ झाली.

## ३ लघुउद्योग क्षेत्राच्या विकासाची तुलनात्मक स्थिती:

जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेपूर्वी (१९८०-८१ ते १९९४-९५) आणि स्थापनेनंतरच्या काळातील (१९९५-९६ ते २०१८-१९) लघुउद्योग क्षेत्राच्या प्रगतीची वार्षिक संयुक्त वार्षिक अभिवृद्धी दराच्यासाह्याने तूलना केल्यास (तक्ता क्र.१) लघुउद्योगांची संख्या आणि लघुउद्योगांच्या निर्यात वाढीचा दर अनुक्रमे १७.१० टक्क्यांवरून ९.२५ टक्के आणि २२.७८ टक्क्यांवरून १५.८१ टक्क्यांपर्यंत कमी झाल्याचे दिसून येते. तर उत्पादन (११.०७ टक्क्यांवरून १२.४५ टक्के) आणि रोजगार ( ७.३४ टक्क्यांवरून ८.४५ टक्के) वाढीच्या दरात जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेपूर्वीच्या काळाशी तुलना करता स्थापनेनंतरच्या काळात वाढ झाल्याचे दिसून येते.

## ४ लघुउद्योग क्षेत्रासाठी राखीव वस्तूंचे उत्पादन रद्द:

लघुउद्योग क्षेत्राच्या विकासासाठी तसेच मोठया उद्योगांपासून लघुउद्योगांचे संरक्षण व्हावे या उद्देशाने भारत सरकारने १९६७ पासून लघुउद्योग क्षेत्रासाठी काही उत्पादने राखून ठेवण्याचे धोरण स्वीकारले होते. १९९० पर्यंत ८३६ वस्तूंचे उत्पादन लघुउद्योगांसाठी राखून ठेवण्यात आले होते.जागतिक व्यापार संघटनेचे नियम, अटी, तरतूदी आणि करार यांना अनुसरून हे आरक्षण टप्याटप्याने रद्द करण्यात आले १९९७ ते २०१५ या काळात आरक्षण रद्द केलेल्या वस्तूंची संख्या तक्ता क्र२ मध्ये दर्शविली आहे. १९९७ मध्ये आबिद हुसेन समितीच्या

### तक्ता क्रमांक १

### जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेपूर्वी आणि स्थापनेनंतर लघुउद्योग क्षेत्राचा विकास

| अ.क्र. | वर्ष | लघुउद्योगांची संख्या (लाख) | उत्पादन (कोटी रुपये) | रोजगार (लाख व्यक्ती) | निर्यात (कोटी रुपये) | एकूण निर्यातीतील शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | १९८०-८१ | ८.७४ | २८,०६० | ७१.०० | १,६४३ | २४.४८ |
| २. | १९९४-९५ | ७९.६० | १,२२,१५४ | १९१.४० | २९,०६८ | ३५.२० |
| ३. | १९९५-९६ | ८२.८४ | १,४७,७१२ | १९७.९३ | ३६,४७० | ३४.२५ |
| ४. | १९९६-९७ | ८६.२१ | १,६७,८०५ | २०५.८६ | ३९,२४८ | ३३.३९ |
| ५. | १९९७-९८ | ८९.७१ | १,८७,२१७ | २१३.१६ | ४४,४४२ | ३५.१९ |
| ६. | १९९८-९९ | ९३.३६ | २,१०,२५४ | २२०.५५ | ४८,९७९ | ३४.५९ |
| ७. | १९९९-०० | ९७.१५ | २,३३,७६० | २२९.१० | ५४,२०० | ३३.९७ |
| ८. | २०००-०१ | १०१.१० | २,६१,२९७ | २३८.७३ | ६७,७९७ | ३४.४७ |
| ९. | २००१-०२ | १०५.२१ | २,८२,२७० | २४९.३३ | ७१,२४४ | ३४.०८ |
| १०. | २००२-०३ | १०९.४९ | ३,१४,८५० | २६०.२१ | ८६,०१३ | ३३.७१ |
| ११. | २००३-०४ | ११३.९५ | ३,६४,५४७ | २७१.४२ | ९७,६४४ | ३३.२८ |
| १२. | २००४-०५ | ११८.५९ | ४,२९,७९६ | २८२.५७ | १,२४,४१७ | ३३.१४ |
| १३. | २००५-०६ | १२३.४२ | ४,९७,८४२ | २९४.२१ | १,५०,२४२ | ३२.९१ |
| १४. | २००६-०७ | २६१.०१ | ७,०९,३९८ | ५९४.६१ | १,८२,५३८ | ३१.९२ |
| १५. | २००७-०८ | २७२.७९ | ७,९०,९५९ | ६२६.६४ | २,०२,०१७ | ३०.८० |
| १६. | २००८-०९ | २८५.१६ | ८,८०,८०५ | ६५९.३५ | २,१२,४०८ | २५.२६ |
| १७. | २००९-१० | २९८.०८ | ९,८२,९१९ | ६९५.३८ | २,२३,५७२ | २६.४४ |
| १८. | २०१०-११ | ३११.५२ | १०,९५,७५८ | ७३२.१७ | २,४५,१२७ | २१.१८ |
| १९. | २०११-१२ | ३२५.६० | १२,२१,४४२ | ७७१.२७ | २,६९,१२५ | १८.४५ |
| २०. | २०१२-१३ | ४७७.६० | १८,०९,९७६ | १०६१.५० | ६,९६,०२५ | ४२.५८ |
| २१. | २०१३-१४ | ४९८.५० | १८,३१,६२४ | १११४.३० | ७,९८,९४६ | ४१.९४ |
| २२. | २०१४-१५ | ५१०.६० | १८,५३,५३१ | ११७१.३० | ८,६६,७१६ | ४५.७० |
| २३. | २०१५-१६ | ५३३.७० | १८,७५,६९९ | १२३१.२० | ८,६७,९१२ | ५०.५० |
| २४. | २०१६-१७ | ५६७.८० | १८,९८,१३३ | १२९४.२० | ८,८८,०१४ | ४८.०० |
| २५. | २०१७-१८ | ५८९.५० | २०,४०,४९३ | १३३२.९० | ९,९२,५०६ | ५०.७२ |
| २६. | २०१८-१९ | ६३३.९० | २१,९३,५३० | १३९१.६० | १०,६६,९४४ | ४६.२३ |
| १९८०-८१ ते १९९४-९५ या काळातील संयुक्त वार्षिक अभिवृद्धी दर (%) | | १७.१० | ११.०७ | ७.३४ | २२.७८ | -- |
| १९९५-९६ ते २०१८-१९ या काळातील संयुक्त वार्षिक अभिवृद्धी दर (%) | | ९.२५ | १२.४५ | ८.४५ | १५.८१ | -- |

Source: Govt. of India, Ministry of MSMEs, Various Annual Reports.

**तक्ता क्रमांक २**

**लघुउद्योगांतील आरक्षण रद्द केलेल्या वस्तूंची संख्या**

| अ.क्र | वर्ष | आरक्षण रद्द केलेल्या वस्तूंची संख्या |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १. | १९९७ | १५ |
| २. | १९९९ | ०१ |
| ३. | २००१ | १४ |
| ४. | २००३ | ७५ |
| ५. | २००४ | ८५ |
| ६. | २००५ | १०८ |
| ७. | २००६ | १८० |
| ८. | २००७ | २१२ |
| ९. | २००८ | ९३ |
| १०. | २०१५ | २१ |

Source: Govt. of India, Ministry of MSMEs, Various Annual Reports.

शिफारशीवरून १५ वस्तूंचे आरक्षण रद्द करण्यात आले. त्यानंतर २००५, २००७ आणि २०१५ मध्ये अनुक्रमे १०८, २१२ आणि २१ वस्तूंचे आरक्षण रद्द करण्यात आले. सध्या लघुउद्योग क्षेत्रासाठी एकही वस्तूंचे उत्पादन राखून ठेवण्यात आलेले नाही. त्यामुळे भारतीय लघुउद्योगाना बहुराष्ट्रीय कंपन्या आणि मोठया उद्योगांशी स्पर्धा करावी लागत आहे.

## ५ आय. एस. ओ. प्रमाणपत्र सुविधा:

भारतीय लघुउद्योग क्षेत्रात अनेक उत्कृष्ट दर्जाच्या वस्तूंचे उत्पादन केले जाते. परंतू वस्तूंच्या दर्जाबाबत आंतरराष्टीय दर्जाचे व गुणवत्तेचे प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याने त्यांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध होऊ शकत नाही. म्हणून भारत सरकारने मार्च १९९४ पासून आय.एस.ओ. ९००० आणि नंतर आय.एस.ओ.१४००१ प्रमाणपत्र मिळविण्यासाठी प्रयन्त करणाऱ्या लघुउद्योगांना ७५००० रुपये अर्थसहाय्य देण्याचे धोरण स्वीकारले आहे. या योजनेंतर्गत १९९५-९६ मध्ये ४८ लघुउद्योगांना २५ लाख रुपये अर्थसहाय्य देण्यात आले. (तक्ता क्र.३) त्यानंतर २००५-०६ आणि २०१७-१८ मध्ये अनुक्रमे २०२६ लघुउद्योगाना ९.७६ कोटी रुपये आणि ११४६ लघुउद्योगांना १०.३८ कोटी रुपये अर्थसहाय्य देण्यात आल्याचे स्पष्ट होते.

## ६ बौद्धिक संपदा सुलभीकरण केंद्र:

भारत सरकारने जागतिक व्यापार संघटनेच्या बौद्धिक संपदा विषयक करारांचीभारतीय लघु उद्योजकांना माहिती व्हावी. म्हणून बौद्धिक संपदा सुलभीकरणकेंद्रांची स्थापना केली आहे. या केंद्रांमार्फत लघुउद्योजकांना पेटंट, कॉपीराईट व ट्रेडमार्क, व्यापार चिन्हे, भौगोलिक चिन्हांकन, संघटीत बाजार, व्यापारिक रहस्य इत्यादी संबंधी मार्गदर्शन केले जाते. २०१२-१३ मध्ये बौद्धिक संपदा अधिकार जनजागृती कार्यक्रमांसाठी सरकारने १.८८ कोटी रुपये खर्च केले. त्याचा लाभ देशातील विविध भागातील १,९९० लघुउद्योजकांना झाला. त्यानंतरच्या

काळात या खर्चात तसेच लाभार्थ्यांच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली. २०१६-१७ मध्ये सरकारने २.४७ कोटी रुपये जनजागृती कार्यक्रमांसाठी खर्च केले आणि त्याचा फायदा ६,३५५ लघुउद्योजकांना झाला.

**तक्ता क्रमांक ३.**

**आय.एस.ओ.९००० व आय.एस.ओ.१४००१ योजनेंतर्गत लघुउद्योगांनाकेलेले अर्थसहाय्य**

| अ.क्र | वर्ष | लघुउद्योगांचीसंख्या | अर्थसहाय्य (कोटी रुपये) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | १९९३-९४ | ०३ | ०.०१ |
| २. | १९९५-९६ | ४८ | ०.२५ |
| ३. | १९९८-९९ | १७४ | ०.९६ |
| ४. | २०००-०१ | ६४९ | ४.०५ |
| ५. | २००३-०४ | ९१७ | ४.७७ |
| ६. | २००५-०६ | २,०२६ | ९.७६ |
| ७. | २००८-०९ | ७८० | ३.२६ |
| ८. | २०११-१२ | १,०४७ | ५.९५ |
| ९. | २०१४-१५ | १२५ | ०.७४ |
| १०. | २०१७-१८ | १,१४६ | १०.३८ |

Source: Govt. of India, Ministry of MSMEs, Various Annual Reports.

### ७ सार्वजनिक खरेदी धोरण:

जागतिक व्यापार संघटनेचे सभासदत्व स्वीकारल्यानंतर भारत सरकारने लघुउद्योग क्षेत्रासाठी राखीव वस्तूंचे आरक्षण रद्द करणे, व्यापारावरील बंधने कमी करणे, आयात शुल्कात कपात करणे, देशांतर्गत उद्योगांना दिलेल्या विविध सवलती हळूहळू काढून घेणे यासारखे निर्णय घेतले. परिणामी लघुउद्योगांना मोठया व बहुराष्ट्रीय कंपन्यांशी जीवघेणी स्पर्धा करावी लागत आहे त्यामुळे अनेक लघुउद्योग मागणीचा अभाव आणि मालविक्रीचे प्रश्न या दोन कारणांनी आजारी किंवा बंद पडत आहे म्हणून भारत सरकारने २०१२ मध्ये सार्वजनिक खरेदी धोरण जाहीर केले. या धोरणानुसार सर्व सार्वजनिक उपक्रम, शासनाचे विविध विभाग, महामंडळे तसेच राष्ट्रीयीकृत व्यापारी बँकांनी आपल्या वार्षिक एकूण खरेदीपैकी २० टक्के खरेदी लघुउद्योगांकडून करण्याचे बंधनकारक केले आहे२०१४-१५ मध्ये ११३ सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांनी लघुउद्योगांकडून ९,६०१ कोटी रुपयांची खरेदी केली. २०१७-१७ मध्ये त्यात अनुक्रमे १६८ आणि २४,२२६.५१ कोटी रुपये अशी वाढ झाली.

याशिवाय भारत सरकारने लघुउद्योगांच्याविकासासठी स्वतंत्र मंत्रालयाची स्थापना, उद्योजकता विकास केंद्रांची स्थापना, भांडवल अनुदान योजना, विविध देशांशी तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीयसंस्थांशी सामंजस्य करार, निर्यात अर्थसहाय्य, प्राधान्यक्रम क्षेत्राचा दर्जा, शोध व संशोधनासाठी विविध संस्थांची स्थापना, गुंतवणूक मर्यादेत बदल, परकीय गुंतवणुकीस मान्यता, तंत्रज्ञान आधुनिकीकरण योजना, अल्प व्याजदरात कर्जपुरवठा, अडचणी व प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी विविध समित्या, तज्ञ गट, कृती गट आणि अभ्यास गटांची स्थापना

इत्यादीच्या माध्यमातून नवीन आर्थिक सुधारणा आणि जागतिक व्यापार संघटनेचे सभासदत्व स्वीकारल्यानंतरच्या काळात लघुउद्योगांचे प्रश्नसमस्या व अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत.

## उपाययोजना:

नवीन आर्थिक सुधारणा कार्यक्रमातील तरतूदी जागतिक व्यापार संघटनेचे नियम, अटी व करार, आर्थिक मंदीचे वातावरण आणि लघुउद्योगांच्या समस्या विचारात घेऊन या उद्योगांच्या विकासासाठी पुढील उपाययोजना सुचविता येतील.

१. लघुउद्योगांना मोठया उद्योगांशी तसेच बहुराष्ट्रीय कंपन्यांशी स्पर्धा करावी लागते त्यामुळे त्यांच्यापुढे मालविक्रीचे प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे केंद्र व राज्य सरकारचे विविध विभाग, सार्वजनिक क्षेत्रातील उदयोग, महामंडळे यांनी या उद्योगांकडून जास्तीत जास्त माल खरेदी करावा.

२. कृषी आधारित लघुउद्योगांच्या विकासासाठी सरकारने ग्रामीण भागात उपलब्ध नैसर्गिक संसाधने, पशुधन, दुग्धव्यवसाय, कृषी उत्पादने इत्यादींचे सर्वेक्षण करून ग्रामीण व्यवसाय क्षेत्राची स्थापना करावी.

३. सध्याच्या स्पर्धात्मक वातावरणात लघुउद्योगांनी देखील अधिक सक्षम होणे गरजेचे आहे म्हणून लघुउद्योजकानी आपली स्पर्धाशक्ती वाढविण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार, गुणवत्तापूर्ण व दर्जेदार वस्तूंचे उत्पादन, कर्मचाऱ्यांचे शिक्षण व प्रशिक्षण, नवनवीन बाजारपेठांचा शोध इत्यादीं मार्गांचा अवलंब करावा.

४. लोकसभा टी.व्ही. आणि राज्यसभा टी.व्ही. चॅनेल प्रमाणे भारत सरकारने स्वतंत्र **"उद्यम भारत"** नावाचे टी.व्ही. चॅनेल सुरु करावे. यावरून लघुउद्योग क्षेत्राशी संबंधित धोरणे निर्यातीच्या संधी, सरकारच्या विविध योजना व कार्यक्रम, यशस्वी लघुउद्योजकांच्या मुलाखती त्यांचे अनुभव इत्यादी कार्यक्रम प्रसारित करावे.

५. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक आणि जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांमुळे सरकारला आयातीवर फारसे बंधने घालता येत नाही. त्यामुळे जनतेनेच पुढाकार घेऊन लघुउद्योग क्षेत्रात निर्माण होणाऱ्या स्वदेशी वस्तूंच्या वापरला प्राधान्य देणे गरजेचे आहे

६. जागतिक व्यापार संघटनेचे नियम, अटी व करार आणि नवीन आर्थिक सुधारणा कार्यक्रमातील तरतूदी यांची माहिती लघुउद्योजक, लघुउद्योजकांच्या संघटना तसेच इतर संबंधित विभाग यांना वेळोवेळी देण्यात यावी. जागतिक व्यापार संघटनेच्या व्यासपीठावर भारतीय लघुउद्योगांच्या हिताला बधाब येणार नाही. यासाठी सरकारने विशेष लक्ष्य देणे आवश्यक आहे.

७. लघुउद्योगांना जागतिक बाजारपेठेत सध्या तीव्र स्पर्धेला तोंड द्यावे लागत आहे म्हणून त्यांनी वस्तूचा दर्जा व गुणवत्तायाकडे विशेष लक्ष्य द्यावे. काही देशांचे वस्तूंचा दर्जा व आरोग्य याबाबतचे नियम अतिशय कठोर आहेत. त्यांची पूर्तता झाली नाही तर भारतीयवस्तू परत पाठविल्या जातात. वस्तूच्या गुणवत्तेकडे लक्ष्य दिले तर परदेशी ग्राहकांमध्ये वस्तूंचे आकर्षण वाढेल आणि जागतिक बाजारपेठेत भारताची प्रतिमा खराब होणार नाही.

## समारोप:

भारतीय लघुउद्योगांचे भारताच्या आर्थिक आणि पर्यायाने औद्योगिक विकासातील योगदान सर्व परिचित आहे. नवीन आर्थिक सुधारणा आणि जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांची अंमलबजावणी सुरु झाल्यानंतर लघुउद्योगांसमोर नव्या संधी बरोबरच विविध आव्हाने व समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्यामुळे लघुउद्योगांच्या उत्पादन, गुंतवणूक, रोजगार आणि निर्यातीवर प्रतिकूल परिणाम झालेला दिसून येतो. असे असले तरी जागतिक व्यापार संघटनेचे नियम, अटी, करार आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध देशांशी केलेले द्विपक्षीय,बहुपक्षीय आणि प्रादेशिक करारांची अंमलबजावणी करणे ही आजची काळाची गरज आहे तेंव्हा लघुउद्योजक व लघुउद्योगांशी संबंधित सर्व घटकांनी एकत्र येऊन प्राप्त परिस्थितीला व आव्हानांना समर्थपणे सामोरे गेले पाहिजे. लघुउद्योजकांनी आपली बलस्थाने व संधींचा शोध घ्यावा व आलेल्या संधींचे सोने करावे असे झाले तर भारतीय लघुउद्योग भारताच्या आर्थिक प्रगतीचे इंजिन आणि सर्व आर्थिक - सामाजिक समस्यांवरील रामबाण ईलाज बनल्याशिवाय राहणार नाहीत.

## संदर्भ:


1. Agrawal, P. and Mahajan, V. (March 2003); Challenges Posed for SSIs by WTO, SEDME, Vol.30, No.1, pp.33-40.
2. Bhat, Joyti S.A.(2008); Small and Medium Enterprises and Intellectual Property Rights, RSCI Journal of Management, Vol. 37, No. 1 pp. 6-13.
3. Pooja (2010); Micro, Small and Medium Enterprises (MSMEs) in the Indian Economy: Business Development Strategies, New Century Publications, New Delhi, p. 9.
4. Padmanabhan, K. (2011); WTO and Small Enterprise in India, New Century Publications, New Delhi.
5. Ramprasad, M.V. (2003); WTO and its Implications on Indian SSIs, Indian Economic Panorama, Vol.13, No.2, pp.12-14.
6. Rashid, Abdul and Ahmed, Jaynal Ud-Din (2014); Micro, Small and Medium Enterprise (MSMEs) in India: Institutional Framework Problems and Policies, New Century Publications, New Delhi, p.9-10.
7. अभंग, एस.बी. (२०१९); नवीन आर्थिक सुधारणांचा लघुउद्योगांच्या विकासावरील प्रभाव, अहमदनगर आणि पुणे जिल्ह्यांच्या संदर्भात एक तूलनात्मक अभ्यास, अप्रकाशित पीएच.डी. शोध प्रबंध, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
8. खुरुद,भा. श. (२००२); नवीन आर्थिक सुधारणांचे पहिले दशक आणि लघुउद्योग क्षेत्राचा विकास,अर्थसवांद, खंड २६, अंक ३, पृष्ठ क्र. २४५-२५५ .
9. थॉमस,जे.जे. (२०१०); भारतातील लघु औद्योगिक क्षेत्र: समस्या व आव्हाने, समाज प्रबोधन पत्रिका, खंड २४, अंक १८९-१९२, पृष्ठ क्र. १४५-१५०.
10. Govt. of India, Ministry of MSMEs, Various Annual Reports.